॥श्री राम समर्थ॥ ॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड मो. ९७६७०४०८४३ ७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, प्पई (७८६),प्पई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २२२ वा | शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# 'एमपीएससी'च्या लाखो विद्यार्थ्यांवर पुन्हा संकट

## तहसीलदारांना थेट उपजिल्हाधिकारी पदोन्नतीचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी पुन्हा एकदा चिंतेची बातमी समोर आली आहे. यापूर्वी १०८ तहसीलदारांना थेट उपजिल्हाधिकारी पदावर पदोन्नती दिल्यानंतर निर्माण झालेल्या वादळाचे पडसाद अद्याप शमले नसतानाच, आता आणखी ५१ तहसीलदारांना उपजिल्हाधिकारीपदी बढती देण्याच्या हालचाली महसूल विभागात वेगाने सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रस्तावामुळे 'एमपीएससी'च्या माध्यमातून प्रशासनात प्रवेश करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मोठी अस्वस्थता निर्माण झाली आहे.

### ५१ अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात

महसूल विभागाने तहसीलदार संवर्गातील ५१ अधिकाऱ्यांना पदोन्नतीने उपजिल्हाधिकारी पदावर नियुक्त करण्याचा प्रस्ताव तयार केला असून तो अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. लवकरच हा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांकडे मंजुरीसाठी पाठवला जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.




### आधीच वादग्रस्त ठरलेला निर्णय पुन्हा चर्चेत

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने यापूर्वी १०८ तहसीलदारांना थेट उपजिल्हाधिकारी पदावर पदोन्नती दिली होती. त्या निर्णयावर विद्यार्थ्यांनी तसेच विविध संघटनांनी तीव्र आक्षेप घेतला होता. सेवा प्रवेश नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत आंदोलनाची हाक देण्यात आली होती. त्या वादानंतरही सरकार पुन्हा त्याच मार्गावर चालत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

### सेवा नियमांवर प्रश्नचिन्ह

राज्यात उपजिल्हाधिकारी संवर्गातील एकूण ६०० पदे मंजूर आहेत. नियमांनुसार यातील ५० टक्के म्हणजे ३०० पदे 'एमपीएससी'मार्फत भरली जाणे बंधनकारक आहे, तर उर्वरित ३०० पदे पदोन्नतीने भरली जातात. मात्र विद्यार्थ्यांच्या मते, पदोन्नतीचा कोटा पूर्ण झाल्यानंतरही अशा प्रकारे अतिरिक्त पदोन्नती देणे हे नियमबाह्य आहे.

### 'एमपीएससी' उमेदवारांचे भवितव्य धोक्यात

स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपजिल्हाधिकारी हे अत्यंत प्रतिष्ठेचे आणि महत्त्वाचे पद मानले जाते. मात्र ही पदे मोठ्या प्रमाणावर पदोन्नतीने भरली गेल्यास भविष्यात या पदांसाठी 'एमपीएससी'कडे मागणीच येणार नाही, अशी भीती विद्यार्थ्यांकडून व्यक्त केली जात आहे. परिणामी, परीक्षार्थ्यांच्या संधींवर गदा येण्याची शक्यता आहे.

### रिक्त पदे असूनही भरती रखडली

सध्या 'एमपीएससी'मार्फत भरल्या जाणाऱ्या उपजिल्हाधिकारी पदांच्या सुमारे ५८ जागा रिक्त आहेत. मात्र राज्य सरकारने या जागांसाठी वेळेत मागणी नोंदवली नसल्यामुळे ही भरती अद्याप रखडली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. एकीकडे रिक्त पदे भरली जात नसताना, दुसरीकडे पदोन्नतीच्या प्रक्रियेला गती दिली जात असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### कोट्यातील जागांवर डोळा?

पदोन्नतीसाठी संबंधित कोट्यातील जागा रिक्त असणे आवश्यक असते. तसेच ज्येष्ठता यादी अंतिम करूनच प्रक्रिया राबवली जाते. मात्र सध्या पदोन्नतीच्या कोट्यातील जागा रिक्त नसतानाही ही प्रक्रिया राबवली जात असल्याचा आरोप विद्यार्थ्यांकडून केला जात आहे. त्यामुळे पारदर्शकतेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

### विद्यार्थ्यांचा इशारा

या निर्णयाविरोधात राज्यभरातील 'एमपीएससी' विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, लवकरच तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात येत आहे. 'सरकारने तात्काळ हा प्रस्ताव मागे घ्यावा आणि रिक्त पदांसाठी 'एमपीएससी'मार्फत भरती प्रक्रिया सुरू करावी,' अशी मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे.

### सरकारची भूमिका काय?

दरम्यान, या प्रस्तावाबाबत राज्य सरकारकडून अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. मात्र प्रशासनातील रिक्त पदे लवकर भरण्यासाठी पदोन्नतीचा मार्ग अवलंबला जात असल्याचे सांगितले जात आहे. तरीही, या निर्णयामुळे निर्माण झालेला वाद आणखी तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# 'अनंत' माणुसकीच्या महोत्सवातून समाजाला नवी दिशा- पवार

## शिखर पहारिया फाउंडेशनने फुलविले हजारो चेहऱ्यावर हास्य

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सुप्रसिद्ध उद्योगपती अनंत मुकेश अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त शिखर पहारिया फाउंडेशनच्या वतीने विविध १४ महाउपक्रमांद्वारे माणुसकीचा महोत्सव साजरा केला. उपस्थित हजारो महिला, विद्यार्थिनी, विद्यार्थी आणि नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविले. "अनंत" आनंदाचा शिधाने ५ हजार घरांची चूल उजळणार आहे. १४ ठिकाणी अन्न, शिक्षण, आरोग्य व स्वावलंबनाला मोठे बळ दिले.

प्रसिद्ध उद्योगपती अनंत मुकेश अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त शिखर पहारिया फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ५ हजार गरजू कुटुंबांना अन्नधान्य किट वाटपसह शहर व जिल्ह्यात तब्बल १४ ठिकाणच्या विविध समाजोपयोगी महाउपक्रमांचा महाशुभारंभ कार्यक्रम गुरुवारी सोलापूर शहरातील जुनी मिल कंपाऊंडमधील मैदान येथे उत्साही वातावरणात पार पडला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, फाउंडेशनचे तन्वीर शेख, राज सलगर, धर्मराज गुंडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वृक्ष कुंडीत पाणी देऊन पर्यावरणाचा संदेश दिला. त्यानंतर महाउपक्रमांचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार म्हणाल्या, शिखर पहारीया फाउंडेशनच्या वतीने प्रसिद्ध उद्योगपती अनंत अंबानी यांचा वाढदिवस महा उपक्रमाने साजरा केला. "अनंत" माणुसकीच्या महोत्सवातून समाजाला नवी दिशा या महाउपक्रमाने दिली आहे. आपण वाढदिवस साजरा करत नाही, तर माणुसकीचा उत्सव साजरा करत आहोत. अनंत अंबानी यांच्या प्रेरणेने समाजसेवेचा हा 'अनंत' प्रवास सुरू आहे.५ हजार कुटुंबांच्या चुली पेटवणे म्हणजे केवळ मदत नव्हे, तर आशेचा दिवा लावणे आहे असे सांगून फाउंडेशनच्या कायार्चे कौतुक केले.



दिवसभरात सोलापूर शहर व जिल्ह्यात विविध १४ ठिकाणी हे उपक्रम राबवण्यात आले. जिल्ह्यातील २०० विद्यार्थिनींना सायकली, १ हजार विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले आहे. अनाथ आश्रमासाठी ५० बेड देण्यात येत असून, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड सोलापूर या संस्थेत १० डबल बेड, राठोड अनाथ आश्रमात ५ बेड, मोहोळ आश्रम शाळेत १५ बेड देण्यात आले. येथील श्री गेनसिद्ध मंदिर येथे ८ लाख रुपयांचे ५८.५ केव्हीए जनरेटर देण्यात आले. राणी लक्ष्मीबाई मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीग्रह मांजरेवाडी येथे आरओ प्लांट वॉटर मशीन भेट देण्यात आली. बोंबड्याला शाळेत डिजिटल ब्लॅक बोर्ड दिले. कुंभारी येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नगर येथे बोअर मारून सबमर्सिबल पंप सेट बसवून पाण्याची टाकी उपलब्ध केली.२०० महिलांना शिलाई मशीनचे वितरण करून त्यांना स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यास मदत केली.

### शिखर पहारीया फाउंडेशनने समाजसेवेचा मानदंड निर्माण केला : वीणा पवार

शिखर पहारिया फाउंडेशनने अन्न, शिक्षण, आरोग्य व स्वावलंबनाचा आदर्श घालून दिला आहे. समाजसेवेचा मानदंड फाउंडेशनने निर्माण केला आहे. अशा उपक्रमांतून समाज अधिक संवेदनशील आणि सक्षम होतो. इतरांच्या आयुष्यात आनंद निर्माण करणारा हा महोत्सव ठरला आहे. हा उपक्रम प्रत्येकाच्या मनात सेवाभावाची ज्योत पेटवणारा आणि समाजाला दिशा देणारा आहे, असे महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार म्हणाल्या.

### शिखर पहारीया फाउंडेशनच्या या परिवाराने घेतले परिश्रम

महा उपक्रमाच्या शुभारंभ कार्यक्रमाचे नेटके नियोजन करण्यात आले होते. आवश्यक ती सर्व सुविधा उपलब्ध केली होती. हा समारंभ यशस्वी पार पाडण्यासाठी फाउंडेशनचे तन्वीर शेख, राज सलगर, धर्मराज गुंडे, कौशल शिंदे, सूर्या शेट्टीयार, तुषार जोगदनकर, धीरज खंदारे, धीरज कारंडे , इब्रान शेख, महताब शेख, पवन इगवे, राहुल तलवर, हरीश जाधव, प्रकाश बगलोलू ,अजय भंडारे, कृष्ण भंडारे, गणेश आमटेपागुल, ओंकार नवले, राजेश शिंगे, संजय भरड यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी विविध १० शाळांमध्ये आरओ फिल्टर प्लांट बसविण्यात येत आहेत. तसेच शहर व जिल्ह्यातील शाळांना डिजिटल स्मार्ट बोर्ड देण्यात आले असून, १० शाळांमध्ये संगणक संच देऊन विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नयेत या उद्देशाने ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या दत्तक घेण्यात आले आहे.शाळांमध्ये स्मार्ट बोर्ड, संगणक संच आणि आरओ प्लांट बसवून आधुनिक शिक्षणाची दारे उघडली जात आहेत.याशिवाय सोलापुरात १०० ठिकाणी जनावरांसाठी पाण्याची सोय करण्यासाठी पाण्याची पात्रे बसविण्यात येत असून, त्याठिकाणी नियमित पाणी पुरवठाही केला जाणार आहे. वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या घरांसाठी तसेच मंदिरांसाठी १ हजार पत्र्यांचे वाटप करण्यात आले आहे. आरोग्य उपक्रम राबवून मोठा दिलासा देण्यात येणार असून आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या गरजू रुग्णांसाठी विविध प्रकारच्या १०० शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. एकाच दिवशी इतक्या व्यापक प्रमाणावर महाउपक्रम राबवून सोलापूर जिल्ह्यात माणुसकीचा महोत्सव साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक धर्मराज गुंडे यांनी केले. तन्वीर शेख यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर राज सलगर यांनी आभार मानले.

### जिल्हा रुग्णालयात ३८ लाखांचे वैद्यकीय साहित्य

नवनिर्मित सोलापूर जिल्हा रुग्णालयात 38 लाखांचे वैद्यकीय साहित्य प्रदान करण्यात आले. या रुग्णालयाचे अतिरिक्त शल्यचिकित्सक डॉ. चंद्रकांत क्षीरसागर, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहन वायचळ, मेट्रन विजयमाला बेले यांच्यासह अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या वैद्यकीय साहित्य सामग्रीमुळे जिल्हा रुग्णालयात रुग्णांना चांगली आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध होणार आहे.

### वाढदिवसानिमित्त उपक्रमाची ठळक वैशिष्ट्ये अशी

- सोलापूर शहर-जिल्ह्यात १४ ठिकाणी एकाच दिवशी उपक्रम
- ५ हजार कुटुंबांना अन्नधान्य किट वाटपाचा शुभारंभ
- शिक्षण, आरोग्य, पाणी व स्वावलंबनावर विशेष भर
- हजारो महिला, विद्यार्थिनी, विद्यार्थी आणि नागरिकांची उपस्थिती
- ३०० विद्यार्थी दत्तक , १ हजार बॅग, २०० मुलींना सायकली वाटप
- १०० मोफत शस्त्रक्रियाने गरीब रुग्णांना दिलासा
- २०० महिलांना शिलाई मशीन

# दूध दरकपातीमुळे रोज २४ लाखांचा फटका

## प्रतिलिटर दोन रुपये कपात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातून दूध संकलन करणाऱ्या पुणे जिल्ह्यातील दोन मोठ्या खाजगी उद्योगांनी गायीच्या दुधाच्या खरेदी दरात कपात केली आहे. प्रतिलिटर दोन रुपये इतकी कपात करण्यात आली आहे.

यामुळे जिल्ह्यातील दूध उत्पादकांना दररोज २४ लाखांचा तोटा सहन करावा लागत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून दूध व्यवसायात सुधारणा दिसू लागली होती. मात्र, युद्धाचे कारण पुढे करत खाजगी उद्योगांनी पुन्हा एकदा दरात कपात करत शेतकऱ्यांची अडवणूक सुरू केली आहे.

गेल्या दोन वर्षांपासून मंदीच्या तडाख्यात असलेल्या दूध व्यवसायाला चालू वर्षात बरे दिवस येण्याची चिन्हे दिसत होती. गेल्या दोन महिन्यांत दुधाच्या दरात सातत्याने सुधारणा होऊ लागली होती. गायीच्या दुधाचे खरेदी दर प्रतिलिटर ३९ ते ४० रुपये झाले होते. पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक गायीचे दूध उत्पादक असलेला जिल्हा म्हणून सोलापूरची ओळख आहे. दररोज सुमारे २५ लाख लिटर गायीचे दूध उत्पादित होते.

अमेरिका-इराण युद्धापूर्वीच दूध व्यवसायात तुटवडा जाणवू लागला होता. त्याचबरोबर उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर उत्पादनही घटण्यास सुरुवात झाली होती. बाजारातील दुग्धजन्य उपपदार्थांची वाढलेली मागणी आणि कमी झालेले उत्पादन याचा परिणाम दिसू लागला होता. फेब्रुवारीपर्यंत गतवर्षीच्या तुलनेत गायीच्या दुधाच्या खरेदी दरात चार ते पाच रुपयांची वाढ झाली होती. मात्र, युद्ध सुरू होताच त्याचे परिणाम दूध व्यवसायावर दिसू लागले.

गेल्या दोन वर्षांत शेतकऱ्यांनी पदरमोड करत दारातील जनावरे जगवली आहेत. दोन महिन्यांपासून शेतकऱ्यांच्या हातात काहीतरी उरण्याची स्थिती निर्माण झाली होती. मात्र, युद्धाने तीही हिरावून घेतली आहे.

### जिल्हा दूध संघाची जाणवू लागली उणीव

जिल्ह्यात दररोज सुमारे २५ लाख लिटर गायीचे दूध उत्पादन होते. त्यापैकी पुणे जिल्ह्यातील दोन मोठे संघ अनुक्रमे सात लाख व पाच लाख लिटर दूध संकलित करतात. उर्वरित दूध अमूल या गुजरातमधील संघाबरोबर परराज्यातील काही खाजगी संघांकडे जाते. तसेच, सध्या जिल्ह्यातील 'शिवामृत' हा एकमेव सहकारी संघ दूध संकलित करतो. कोल्हापूरसारख्या जिल्ह्यात सक्षम जिल्हा दूध संघ असल्यामुळे तेथील दूध उत्पादकांना न्याय मिळतो. मात्र, सोलापूर जिल्ह्यातील दूध व्यवसाय खाजगी दूध संघांच्या मगरमिठीत सापडल्यामुळे आर्थिक लूट होत असल्याचा दावा केला जातो.

# काँग्रेसच्या खासदार असल्याने सत्ताधारी भाजपकडून DPDC निधीची अडवणूक

## निधी तात्काळ मंजूर करा, अन्यथा रस्त्यावर उतरण्याचा प्रणिती शिंदे यांचा इशारा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून (DPDC) निधी मंजूर करावा, अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे बाधित शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी तसेच संजय गांधी निराधार योजनेतील कागदपत्रांच्या जाचक अटी शिथिल कराव्यात, या तीन प्रमुख मागण्यांसाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी नूतन जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव एस. कार्तिकेयन यांची ग्रामस्थांसह भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सोलापूर लोकसभा मतदारसंघातील जिल्हा परिषदेकडील जनसुविधा योजना, नागरी सुविधा योजना, तीर्थक्षेत्र विकास निधी, ग्रामीण मार्ग मजबुतीकरण (३०५४), इतर जिल्हा मार्ग मजबुतीकरण (५०५४), लघुपाटबंधारे विभागांतर्गत पाझर तलाव व कोपा बंधारे दुरुस्ती व मजबुतीकरण, प्राथमिक शाळांच्या नव्या खोल्या बांधकाम व दुरुस्ती, पशुसंवर्धन दवाखान्यांची देखभाल व दुरुस्ती, तसेच महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील जिल्हास्तर नगरोत्थान योजना, आण्णाभाऊ साठे नागरी विकास योजना, दलितेतर वस्ती विकास योजना, अग्निशामन बळकटीकरण आदी विविध योजनांअंतर्गत विकासकामांसाठी स्वतंत्र कामांची यादी संबंधित यंत्रणांकडे सादर करण्यात आलेली आहे.

यापूर्वीही पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून या कामांना मंजुरी देण्याची मागणी वारंवार करण्यात आली होती. मात्र अद्यापही संबंधित कामांना मंजुरी व निधी मिळालेला नसल्याने ही बाब गंभीर असल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी निवेदनात नमूद केले. लोकहिताची कामे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवली जात असल्याचा आरोपही खासदार प्रणिती शिंदे यांनी यावेळी केला. सुचविलेल्या कामांना प्राधान्याने मंजुरी देऊन प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी संबंधितांना तातडीने आदेश द्यावेत, तसेच हे पत्र मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत निधी मंजूर करावा, अन्यथा आंदोलन व आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

तसेच मार्च व एप्रिल २०२६ महिन्यांत सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ, पंढरपूर, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर व अक्कलकोट तालुक्यांत वादळी वाऱ्यासह गारपीट व अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान (पान 2 वर..)


सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
-: संपर्क :-
शिनगारे.जे.एम 8275274353
डी.बी.शिंदे 9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

## संपादकीय

# खतटंचाईचा सांगावा

भारताकडे जगातील दुसऱ्या क्रमाकांची सर्वाधिक सुमारे १,५४० लाख हेक्टर लागवडीयोग्य जमीन आहे. तीनही हंगामांत पिके घेता येर्णाया जगातील काही मोजक्या देशांत भारताचा समावेश आहे. हिमालयीन राज्यांतील काही जमीन वगळता देशाच्या उर्वरित भागात खरीप, रब्बी आणि उन्हाळी, अशा तीन हंगामांत पिके घेतली जातात.

त्यात बारमाही फळपिकांचाही समावेश आहे. खरीप हंगामात सरासरी १,१०० लाख हेक्टरवर लागवड होते. खरिपातील पिकांसाठी देशाला सुमारे ३९० लाख टन रासायनिक खतांची गरज असते. त्यात सुमारे १९० लाख टन युरियाचा समावेश असतो.

युद्ध भडकण्यापूर्वी झालेली आयात आणि देशातील विविध खत प्रकल्पांमध्ये उत्पादित झालेल्या खतांचा सुमारे ४६ टक्के साठा उपलब्ध (ओपनिंग स्टॉक) आहे. पण आणखी सुमारे ३० टक्के खतांची मागणी जगभरातील देशांकडे नोंदविली गेलेली असून तिचे मात्र भवितव्य अधांतरी आहे. कारण आखाती युद्धामुळे आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक जवळपास बंदच असल्यामुळे खतांच्या पुरवठ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. खतटंचाईचा प्रश्न इतका गंभीर आहे की, आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील प्रमुख मंत्र्यांच्या उपस्थितीत घेतल्या जार्णाया प्रत्येक आढावा बैठकीत खतांच्या मुद्द्यावर चर्चा केली जात आहे.

आपली खतांची गरज पूर्ण करण्यासाठी प्रामुख्याने ओमान, रशिया, सौदी अरेबिया, मोरोक्को आणि चीन यांसारख्या देशांतून आयात केली जाते. अडचणीच्या काळात चीन नेहमी दगा देतो, त्याचा प्रत्यय आताही येत आहे. चढ्या दराने करार करूनही चीन खते आणि कच्च्या मालाच्या निर्यातीत हात आखडता घेत आहे. आखातातून तयार युरिया आणि युरिया निर्मितीसाठी लागर्णाया नैसर्गिक वायूची आयात विस्कळीत झाली आहे.

डाय अमोनियम फॉस्फेट (डीएपी) प्रामुख्याने रशिया, सौदी अरेबिया, चीन, मोरोक्को आणि जॉर्डन या देशांवर अवलंबून आहे. पण ही आयात विस्कळीत झाली आहे. भारतात पोटॅशचे (एमओपी) साठे नसल्यामुळे देशाला १०० टक्के आयात करावी लागते. मुख्यत्वे सौदी अरेबिया, मोरोक्को, कॅनडा, रशिया आणि बेलारूसमधून याची आयात होते. नत्र, स्फुरद, पलाश (एनपीके) या संयुक्त खतांसाठी रशिया हा भारताचा सर्वात मोठा पुरवठादार असून, त्याखालोखाल सौदी अरेबिया, चीन आणि इंडोनेशिया या देशांचा क्रमांक लागतो.

देशात युरिया निर्मिती प्रकल्प आहेत, पण त्यांना क्षमतेच्या ६० टक्के नैसर्गिक वायूचा पुरवठा केला जात आहे. त्यामुळे युरिया निर्मितीवर परिणाम झाला आहे. स्फुरद, पलाश खतांची सुमारे ९० टक्के आयात करावी लागते, ही आयात बंद आहे. जॉर्डन, ट्युनिशिया, ओमानमध्ये भारतीय खत कंपन्या इफ्को, कृभको यांचे खतांचे प्रकल्प आहेत. पण युद्धजन्य स्थितीमुळे उत्पादन विस्कळीत झाले आहे.

रशिया, युक्रेन, कॅनाडा, इंडोनेशियामधून पयार्यी खत आयातीचे प्रयत्न सुरू आहेत. पण त्यात अनेक अडचणी येत आहेत. केंद्र सरकारकडून गतवर्षी सर्व प्रकारच्या खत आयातीवर सुमारे १.३० लाख कोटी रुपयांचे अनुदान दिले होते. रशिया- युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर २०२२-२३ खतटंचाई निर्माण झाल्यामुळे २.२५ लाख कोटी रुपयांचे अनुदान दिले होते. यंदाही खतांवरील अनुदान दोन लाख कोटींच्या पुढे जाण्याचा अंदाज आहे. आखाती देश युद्धाच्या खाईत लोटले असल्यामुळे खते आणि खतांसाठीच्या कच्च्या मालाच्या आयातीवर मोठा परिणाम झाला आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी आयात बंद असल्यामुळे बिगरआखाती देशांतून होणारी खतांची आवक थांबली आहे. अन्य पयार्यी समुद्रमागार्चा वापर केला तर वाहतूक खर्चात वाढ होते. शिवाय युद्धजन्य स्थितीमुळे खतांचे दरही वाढले आहे. वाढीव दराने करार करूनही खतांची आयात होत नाही. जहाज वाहतूक कंपन्या आणि जहाज वाहतुकीला विमा संरक्षण देर्णाया कंपन्याही वाहतूक करण्यास तयार नाहीत. त्यामुळे खरीप हंगामात युरियासह अन्य खतांची टंचाई भासणार हे जवळपास नक्की आहे. हंगामातील पहिले दोन महिने पुरेल इतकाच खतसाठा आहे. सरकार उपलब्ध खतांचे वितरण कसे करते, काळाबाजार, दरवाढ कसे रोखते, यावरच यंदाच्या खरीप हंगामाचे भवितव्य अवलंबून आहे.

# रेतीघाटाला तरी सोडा - नद्यांना वाहू द्या...

'रेतीघाटाला तरी सोडा... नाहीतर सर्वच संपायला वेळ लागणार नाही!' ही केवळ भावनिक हाक नाही, तर एका उद्ध्वस्त होत चाललेल्या पर्यावरणाची, मरत चाललेल्या नद्यांची आणि धोक्यात आलेल्या ग्रामीण जीवनव्यवस्थेची आक्रोशपूर्ण हाक आहे. आज महाराष्ट्रासह देशभरात रेतीघाट म्हणजेच नदीपात्रातील वाळू उत्खनन हा केवळ एक व्यवसाय राहिलेला नाही, तर तो एक संघटित लूटमार उद्योग बनला आहे. आणि दुर्दैवाने या लुटीचे छुपे किंवा उघड संरक्षण करणारे अनेकदा तेच लोकप्रतिनिधी असतात, ज्यांच्यावर जनतेच्या हिताचे रक्षण करण्याची जबाबदारी असते.

नदी ही केवळ पाणी वाहणारी नसते; ती एक सजीव परिसंस्था असते. तिच्या तळातील रेती (वाळू) हा त्या परिसंस्थेचा कणा असतो. हीच रेती पाण्याचा नैसर्गिक गाळ फिल्टर करते, भूजल साठवते, नदीच्या प्रवाहाला स्थिरता देते आणि पूर नियंत्रणात महत्त्वाची भूमिका बजावते. पण जेव्हा ही रेती मोठ्या प्रमाणात काढून नेली जाते, तेव्हा नदीचे संतुलन पूर्णपणे ढासळते. नदी खोल, खोल होत जाते, किनारे कोसळतात, पूरप्रवणता वाढते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भूजल पातळी घसरते. याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या विहिरींवर, पिकांवर आणि गावांच्या पिण्याच्या पाण्यावर होतो.

आज अनेक गावांमध्ये पावसाळा संपल्यानंतर काही महिन्यांतच विहिरी कोरड्या पडतात. यामागे केवळ कमी पाऊस कारणीभूत नाही, तर नदीपात्रातील अंधाधुंद रेतीउत्खनन हे एक मोठे कारण आहे. नदीतील रेती म्हणजे नैसर्गिक पाणीसाठा. ती काढून टाकली, की पाणी धरून ठेवण्याची क्षमता संपते. मग पाणी वाहून जाते आणि मागे राहतो तो कोरडेपणा. हे वास्तव समजून घेण्याची गरज आहे, पण लोकप्रतिनिधींच्या डोळ्यांवर लोभाची पट्टी बांधलेली आहे का?. त्यांना आपल्या नद्यांतील वाळू जाताना दिसत नाही का? गल्ली ते दिल्ली लक्ष असणाऱ्या या समाज सुधारक नेत्यांना याबाबत समजत नसेल असे समजायचे का?

रेतीघाटांवर आज जे दृश्य दिसते, ते धक्कादायक आहे. रात्रीच्या अंधारात शेकडो हायवा, ट्रॅक्टर, डंपर नदीत उतरतात. नियम, परवाने, मयार्दा सगळे धाब्यावर बसवले जाते. स्थानिक प्रशासनावर दबाव टाकला जातो, प्रामाणिक अधिकारी बदलीच्या भीतीने गप्प बसतात, आणि जे विरोध करतात त्यांना धमक्या दिल्या जातात. हा प्रकार केवळ पर्यावरणाचा नाही, तर कायद्याच्या राज्याचाही अपमान आहे.

लोकप्रतिनिधींनो, तुम्ही नेमके कोणासाठी निवडून आला आहात? जनतेसाठी की मोजक्या ठेकेदारांसाठी? तुमच्या एका सहीमुळे, एका दुर्लक्षामुळे संपूर्ण नदी मरते, संपूर्ण गाव तहानलेले राहते, आणि पुढील पिढ्यांचे भविष्य उद्ध्वस्त होते. काही लाखांच्या कमिशनसाठी तुम्ही लाखो लोकांच्या जगण्यावर घाला घालत आहात, हे विसरू नका.

जिल्हा खनिकर्म अधिकारी काय करतात? यांची यंत्रणा कुचकामी का आहे? हे नियमानुसार काम करतात का? जिल्हाधिकारी हा जिल्ह्याचा पालक असतो. पण आजकाल यांच्याकडे अतिकायार्चा भार असल्यामुळे, बैठकातील व्यस्तता लक्षात घेता कदाचित खालच्या लोकांना मोकळीक मिळत असेल. त्यामुळे खालचे अधिकारी कारवाई करत नसतील. याचा परिणाम अति उपसा. नियमबाह्य उपसा. निविदांची ऐशी तैशी करत उपसा. या उपसा उपसितच रेती घाटांवर कोणाचाही कंट्रोल राहिलेला दिसत नाही. महसूल बुडतो तो वेगळाच. महसूल बुडताना उघडे डोळे ठेवून तुम्ही आम्ही भाऊ भाऊ, सोबत सर्व मिळून खाऊ या तत्त्वाचा स्वीकार तर होत नाही ना. सर्वांचे दुर्लक्ष होत असेल तर ते खाऊ आणि भाऊ भाऊ यामुळे तर नाही ना.

चौका चौकात पोलीस दादा कॅमेरे हातात घेऊन दिसतात. मग यांना या रेती गाड्या दिसत नाही का? किती गाड्यांना यांनी आजपर्यंत फोटो माध्यमातून टिपले आहे. किती गाड्या ह्या पोलीस स्टेशनला उभ्या आहेत. किती गुन्हे दाखल झालेत. या सगळ्या गोष्टी मन सुन्न करणाऱ्या आहे. आरटीओची भीती यांना का वाटत नाही. हप्ता संस्कृतीत हे सर्व बिंदिकत चालू असेल तर याला जबाबदार कोण?

याहून गंभीर बाब म्हणजे या सगळ्या प्रक्रियेत सामान्य माणूस असहाय्य झाला आहे. गावकरी विरोध करतात, पण त्यांचा आवाज दाबला जातो. काही ठिकाणी तर लोकांनी स्वतःच्या जीवाची बाजी लावून रेती माफियांना रोखण्याचा प्रयत्न केला आहे. पण शासन यंत्रणा त्यांच्या पाठीशी उभी राहत नाही, हीच खरी शोकांतिका आहे.

विकासाच्या नावाखाली रेतीउत्खननाचे समर्थन केले जाते. 'बांधकामासाठी वाळू हवीच,' असे सांगितले जाते. याकरिता विरोध असण्याचे कारण नाही, पण प्रश्न असा आहे की, हा विकास कोणत्या किंमतीवर? जर नदीच उरली नाही, पाणीच मिळाले नाही, तर इमारतींचा उपयोग काय? विकास म्हणजे केवळ काँक्रीटचे जंगल नाही; विकास म्हणजे टिकाऊपणा, पर्यावरणाचे संतुलन आणि लोकांच्या जीवनमानात सुधारणा. जर हा समतोल राखला गेला नाही, तर तो विकास नसून विनाश आहे.

आज गरज आहे ती कठोर आणि प्रामाणिक कारवाईची. नियम आहेत, कायदे आहेत, पण त्यांची अंमलबजावणी होत नाही. प्रत्येक रेतीघाटावर पारदर्शक यंत्रणा उभी केली पाहिजे. उपग्रह नकाशे, जीपीएस ट्रॅकिंग, आणि स्थानिक ग्रामसभेचा सहभाग या सगळ्यांचा उपयोग करून रेतीउत्खननावर नियंत्रण ठेवता येऊ शकते. पण यासाठी राजकीय इच्छाशक्ती आवश्यक आहे, आणि तीच सध्या दिसत नाही.

लोकप्रतिनिधींनो, अजूनही वेळ गेलेली नाही. तुम्ही ठरवले, तर परिस्थिती बदलू शकते. रेतीघाटांवरील लूट थांबवता येऊ शकते. नद्यांना पुन्हा जिवंत करता येऊ शकते. पण त्यासाठी तुम्हाला तुमच्या स्वार्थावर नियंत्रण ठेवावे लागेल. काही ठेकेदारांची मर्जी राखण्याऐवजी जनतेच्या हिताला प्राधान्य द्यावे लागेल.

जनतेलाही आता गप्प बसून चालणार नाही. आपल्या हक्कासाठी, आपल्या पाण्यासाठी, आपल्या नद्यांसाठी उभे राहणे आवश्यक आहे. प्रश्न विचारणे आवश्यक आहे. ҧआमच्या नदीची रेती कुठे जाते?ҧ ҧकोण परवानगी देतो?ҧ ҧकिती प्रमाणात उत्खनन होते?ҧ हे प्रश्न प्रत्येक गावकऱ्याने विचारले पाहिजेत. लोकशाहीत जनता सर्वोच्च असते, आणि तिच्या आवाजापुढे कोणतीही सत्ता टिकू शकत नाही.

एक गोष्ट स्पष्ट आहे. निसगार्शी छेडछाड केल्याचा परिणाम प्रत्येकाला भोगावा लागतो. आज तुम्ही रेती काढून पैसे कमावाल, पण उद्या पाणीच मिळाले नाही, तर त्या पैशाचे काय करणार? तहान भागवण्यासाठी नोटा उपयोगी पडत नाहीत, हे लक्षात ठेवा. म्हणूनच ही कडक, स्पष्ट आणि निर्विवाद विनंती. लोकप्रतिनिधींनो, रेतीघाटाला तरी सोडा. नद्यांना जगू द्या. गावांना जगू द्या. नाहीतर तो दिवस दूर नाही, जेव्हा सर्व काही संपेल आणि मग पश्चात्ताप करण्याशिवाय काहीही उरणार नाही.



**डॉ. प्रवीण महाजन**
जल अभ्यासक

# हवेली तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी 'जलतारा' प्रकल्प राबविणे काळाची गरज- सभापती काकडे

**हवेली (कटूसत्य वृत्त):-** हवेली तालुक्यातील तीव्र पाणीटंचाई लक्षात घेता गावागावात 'जलतारा' प्रकल्प राबविण्याची गरज असल्याचे मत, हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांनी व्यक्त केले.



हवेली पंचायत समितीत या अभियानाची 'विशेष आढावा' बैठक 'जलतारा' प्रकल्पाचे जनक जलतज्ञ डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सध्या उन्हाची तीव्रता वाढली असून गावागावातील विहिरींनी तळ गाठला आहे. तर बोअरवेल ही बंद होण्याच्या मार्गावर आले आहेत. त्यामुळे अनेक गावात दिवसाआड पाणी नागरिकांना मिळत आहे. त्यावर 'जलतारा' प्रकल्प हा अत्यंत प्रभावी उपाय ठरू शकतो. या प्रकल्पावर महाराष्ट्र शासनाचे योजना तयार करण्याचे काम सुरू असून, येणाऱ्या काळात पाणी टंचाईवर मात करण्यासाठी, ही योजना अत्यंत प्रभावी योजना ठरणार आहे.

'जलतारा' प्रकल्पाचा मुख्य उद्देश जमिनीतील पाण्याची पातळी वाढविणे आणि भूजल पुनर्भरण करणे हा आहे. जलतारा प्रणालीमध्ये जमिनीच्या सर्वात उतार भागावर सुमारे ५ फूट लांब, ५ फूट रुंद व ६ फूट खोल आकाराचा खड्डा खोदला जातो. या खड्ड्यांमध्ये दगड, गोटे टाकून तो खड्डा बुजविला जातो. खड्डा बुजवताना साधारणपणे एक फूट वरची जागा रिकामी ठेवली जाते. त्यामुळे पावसाचे पाणी या खड्ड्यात सहजरीत्या जमा होते आणि झिरपून ते जमिनीत मुरते व जमिनीच्या पाणी पातळीत चांगली वाढ होते, असे 'जलतारा' प्रकल्पाचे जनक जलतज्ञ डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी सांगितले.

हवेली तालुका हा पुणे शहराच्या जवळ असुन सुद्धा अनेक गावागावात उन्हाळ्यात पाणी टंचाई आहे. त्यामुळे जलतारा योजना राबविली तर भूजल पुनर्भरण, सिंचन सुधारणा आणि शेती उत्पादन वाढते. भूजल पातळीतही १० ते १५ फुटांची वाढ होते. तसेच अतिवृष्टीतून पाणी साचणे टाळून, पिकांचे संरक्षण होते, वर्षभर सिंचन सुविधाही चांगल्या प्रकारे उपलब्ध होते. 'जलतारा' ही योजना, महाराष्ट्र शासनाची एक महत्त्वाची जलसंधारण योजना म्हणून पुढील काळात समोर येणार असून, याचा मुख्य उद्देश पावसाचे पाणी साठवणे आणि भूजल पातळी वाढविणे हा असणार आहे.

सध्या हा प्रकल्प शासन स्थरावर मान्यतेच्या प्रतिक्षेत असल्याने, हा प्रकल्प तूर्तास हवेली तालुक्यात राबविण्यासाठी, आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या मार्गदर्शनाखाली, हवेली तालुक्यातील सामाजिक संस्था, CSR कंपन्यांच्या व ग्रामपंचायतींच्या सहकार्याने हा प्रकल्प राबविण्याचा, हवेली पंचायत समितीचा विचार असुन, यासाठी गावागावातील होतकरू तरुण शेतकऱ्यांनी एकत्र येऊन, हवेली तालुक्याची पाणी टंचाई दुर करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन सभापती युवराज काकडे यांनी केले.

यावेळी उपसभापती विद्याताई गायकवाड, समाजकल्याण सभापती जितेंद्र बडेकर, जिल्हा परिषद सदस्य रुपालीताई कोंडे, कोमलताई आव्हाळे, शितलताई कांबळे, गटविकास अधिकारी शेखर शेलार, पंचायत समिती सदस्य युवराज वांजळे, सुदर्शन चौधरी, अमोल टेकाळे, सुषमाताई मुरकुटे, कोमलताई कांबळे, राणीताई वाळके यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी, सर्व ग्रामपंचायत अधिकारी व गावोगावचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूरमध्ये 17 एप्रिल रोजी रोजगार मेळावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर यांच्या विद्यमाने शुक्रवार, दिनांक 17 एप्रिल 2026 रोजी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

**उपलब्ध पदे :** प्रिन्सीपल, लिपिक, लॅब टेक्निशियन, लॅब इन्चार्ज, इलेक्ट्रिक ऑपरेटर, इंजिनिअर, मार्केटिंग, हेल्पर, असिस्टंट अकाउंटंट, फॅशन मचंर्डायझर, लाईन मॅनेजर, प्रिंटींग प्रेस, सेल्स एक्झिक्युटिव्ह, डिजिटल मार्केटिंग अशा विविध पदांसाठी भरती होणार आहे.

**शैक्षणिक पात्रता**

10 वी, 12 वी, आयटीआय, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, कोणतीही पदवी, बी.कॉम, एम.कॉम, एमबीए, एम.एड. अशा शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना संधी उपलब्ध आहे.

एकूण 56 पेक्षा जास्त रिक्तपदे 10 उद्योजकांनी ऑनलाईन अधिसूचित केली आहेत.

**मुलाखतीचे ठिकाण व वेळ**

- दिनांकः 17 एप्रिल 2026 (शुक्रवार)
- वेळः सकाळी 10 ते दुपारी 1
- ठिकाणः जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट पार्क चौक, सोलापूर
- उमेदवारांनी रिज्युमच्या तीन प्रती व आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे.

**संपर्क :** अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत 0217-2992956 या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे मार्गदर्शन केंद्राशी संपर्क साधावा. तसेच https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलला भेट द्यावी.

सहायक आयुक्त श्रीमती संगीता खंदारे यांनी सर्व नोकरी इच्छुक उमेदवारांना या रोजगार मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

पान १ वरून

# काँग्रेसच्या खासदार असल्याने...

झाले आहे. केळी, पपई, डाळिंब, पेरू, आंबा, द्राक्षे, मका व बाजरी या पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांना ठऊम्रऋ च्या निकषांनुसार तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे.

संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी वयाचा दाखला म्हणून शाळा सोडल्याचा दाखला व जन्म दाखल्याची सक्तीची अट रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. अनेक लाभार्थ्यांकडे ही कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे पात्र असूनही ते योजनेपासून वंचित राहत आहेत. त्यामुळे पूर्वीप्रमाणे सिव्हिल सर्जनचे प्रमाणपत्र वयाच्या दाखल्यासाठी ग्राह्य धरण्यात यावे, तसेच रहिवासी दाखल्याऐवजी रेशन कार्ड किंवा वीज बिल स्वीकारण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १३(३) नुसार एक वर्षानंतर जन्म किंवा मृत्यू नोंदणी करावयाची असल्यास, सक्षम कार्यकारी दंडाधिकारी यांच्या आदेशानुसार नोंदणी करण्याची तरतूद आहे. प्रत्यक्षात पूर्वी अशा स्वरूपाची प्रकरणे न्यायालयीन प्रक्रियेतून (दंडाधिकारी न्यायालय) मार्गी लागत असत. त्या वेळी पुराव्यांची शहानिशा, शपथपत्रे, साक्षी, व कारणमीमांसा यांचा सखोल विचार होऊन आदेश होत असल्याने नोंदणीची प्रक्रिया शिस्तबद्ध व विश्वासार्ह पद्धतीने पार पडत असे. नंतर प्रशासकीय बदलांमुळे ही अधिकारप्रक्रिया तहसीलदार (कार्यकारी दंडाधिकारी) स्तरावर वर्ग करण्यात आली. तथापि, सद्यस्थितीत तालुका स्तरावर कलम १३ (३) अंतर्गत दाखल असलेली अनेक प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहून कार्यवाही जवळपास ठप्प झालेली आहे. परिणामी नागरिकांना जन्म/मृत्यू दाखले वेळेत मिळत नसल्याने शिक्षण, वारसा, विमा, पेन्शन, बँक व्यवहार, पासपोर्ट आदी अत्यावश्यक बाबींमध्ये गंभीर अडथळे निर्माण होत आहेत. न्यायालयीन प्रक्रियेत असताना अशा प्रकरणांचा निपटारा निश्चित प्रक्रियेनुसार, पुराव्यांच्या कसोटीवर व वेळमयार्देत होत असल्याचा अनुभव होता. सद्य प्रशासकीय पातळीवर तशी प्रणालीकृत तपासणी व वेळबद्धता नसल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

**त्या अनुषंगाने आपणास नम्र विनंती करण्यात येते की–**

१. कलम १३(३) अंतर्गत उशिरा नोंदणीची प्रकरणे पूर्ववत न्यायालयीन (दंडाधिकारी) प्रक्रियेतून निकाली काढण्याबाबत शासनस्तरावर प्रस्ताव सादर करावा.

२. तोपर्यंत पर्यायी उपाय म्हणून, जिल्हास्तरावरून स्पष्ट मानक कार्यपद्धती (SOP), वेळमर्यादा, व पर्यवेक्षण यंत्रणा निश्चित करून तहसीलदार कार्यालयांना बंधनकारक सूचना द्याव्यात.

३. सध्या प्रलंबित असलेल्या सर्व प्रकरणांचा विशेष आढावा घेऊन, त्यांचा तात्काळ निपटारा करण्याबाबत निर्देश द्यावेत.

४. नागरिकांच्या सोयीसाठी, पुराव्यांची शहानिशा व आदेश प्रक्रिया न्यायालयीन पद्धतीच्या धर्तीवर तहसीलदार कार्यालयाकडून राबविण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करावीत.

आपल्या स्तरावरून योग्य त्या प्रशासकीय व धोरणात्मक पावले उचलली गेल्यास, नागरिकांना मोठा दिलासा मिळेल व कायद्याचा उद्देश प्रभावीपणे साध्य होईल. सदर निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक व तात्काळ विचार करून आवश्यक ती कार्यवाही करावी.

यावेळी बोलताना खासदार प्रणिती शिंदे यांनी आरोप केला की, पालकमंत्री आणि सत्ताधारी भाजपकडून मी काँग्रेस पक्षाची खासदार असल्यामुळे सोलापूर लोकसभा मतदारसंघातील विकासकामांसाठी DPDC निधी दिला जात नाही. 'हा निधी वैयक्तिक कामांसाठी नसून गावकऱ्यांच्या मूलभूत सुविधांसाठी मागितला जात आहे. अधिकाऱ्यांवर प्रचंड दबाव टाकला जात असून त्याला अधिकारी बळी पडत आहेत,' असे खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या.

दरम्यान, १५ दिवसांत संबंधित मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास ग्रामस्थ व शेतकऱ्यांना सोबत घेऊन मोठ्या प्रमाणावर आंदोलन व आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही खासदार प्रणिती शिंदे यांनी दिला. यावेळी सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, अक्कलकोट तालुका अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, पंढरपूर तालुका अध्यक्ष संदीप पाटील, मंगळवेढा तालुका अध्यक्ष प्रशांत साळे, मोहोळ तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष भीमाशंकर जमादार, उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष भारत जाधव, पंढरपूर शहर अध्यक्ष आदित्य फत्तेपूरकर, रणजीत पाटील, सुनील खडके, कुमार गोडसे, ज्ञानेश्वर व्हनमाने, बाबुराव भोसले, मोहन मुळे, गणेश खुर्द, शैलेश गोगरधरे, विठ्ठल लवटे, अमर सूर्यवंशी, सचिन गुंड, संजय हेमगड्डी, रियाज हुंडेकरी, प्रवीण निकाळजे, मनोज यलगुलवार, नागेश गंगेकर, गणेश डोंगरे, वाहिद बिजापूरे, राहुल वर्धा, श्रीशैल रणधीरे, नागनाथ कदम, भीमाशंकर टेकाळे, तिरुपती परकीपंडला, सुभाष चव्हाण, सिद्धाराम चाकोते, हरून शेख, शुभम माने, संजय गायकवाड, सागर उबाळे, गोपाल नंदुरकर, सुभाष वाघमारे, लखन गायकवाड, सुनील सारंगी, विवेक कन्ना, नागेश म्याकल, शरद गुमटे, मोतीराम चव्हाण, संदीप मोरे, एजाज बागवान, अनिल वाघमारे आदी उपस्थित होते.

# बालकांच्या असंसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रणासाठी सामंजस्य करार

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने बालकांमधील असंसर्गजन्य आजारांवर (एनसीडी) प्रभावी नियंत्रणासाठी नागपूर येथील एम्स, बालरोग विभागासोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) केला आहे.



**कराराच्या माध्यमातून बालकांसाठी अधिक सुरक्षित, निरोगी आणि समर्थ वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने ठोस पाऊल**

या सामंजस्य कराराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बालकांचे आरोग्य हे राज्याच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. असंसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे ही केवळ आरोग्य क्षेत्राची जबाबदारी नसून समाजाची एकत्रित बांधिलकी आहे. या कराराच्या माध्यमातून आपण मुलांसाठी अधिक सुरक्षित, निरोगी आणि समर्थ वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने एक ठोस पाऊल टाकत आहोत.

हा करार नागपूर येथील एम्स, बालरोग विभागासोबत करण्यात आला असून, या अंतर्गत राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये चाइल्डहूड एनसीडी क्लिनिक्स स्थापन व कार्यान्वित करण्यात येणार आहेत. या उपक्रमातून टाईप-1 मधुमेह, जन्मजात हृदयरोग, दमा, स्थूलता, सिकलसेल, मानसिक आरोग्य आणि विकासात्मक विकार यांसारख्या आजारांचे प्रतिबंध, लवकर निदान आणि प्रभावी उपचार सुनिश्चित करण्यात येणार आहेत. तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, मानकीकृत उपचार पद्धती, डेटा संकलन प्रणाली आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यावर विशेष भर दिला जाणार आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुढाकारातून करण्यात आलेले हा सामंजस्य करार पुढील तीन वर्षांसाठी कार्यान्वित असणार आहे. या करारांमुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत गुणवत्ता, उपलब्धता आणि सर्वसमावेशकता वाढवण्यास मोठी चालना मिळणार आहे.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, आमदार नाना पटोले, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे, उपसचिव विलास बेंद्रे तसेच डॉ प्रशांत जोशी, एम्स नागपूरचे कार्यकारी संचालक, डॉ. मीनाक्षी गिरीश, बालरोग तज्ज्ञ यावेळी उपस्थित होते. एम्स, नागपूर संस्थेचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला.

## वात्रटिका

### मती... बारामती

होय नाही म्हणत युद्ध
बंदची तर घोषणा झाली...
ठाम राहून ठणकावले नि
हायकमांडची सूचना आली...
तिथे माघार घेऊनही तशी
तर कोंडी नि आपत्ती आहे...
ऐनवेळी पदरात पाडून घेते
ती मती म्हणजे बारामती आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. RNI No. MAHMAR 2006/17624

# पंढरपूर कॉरिडॉरविरोधात दुचाकी फेरी; शासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त)** : शासनाच्या ताब्यातील शेकडो एकर जागा पडिक असताना सर्वसामान्यांची घरे पाडून विकास करण्याचा प्रयत्न कितपत नैतिक आहे, असा सवाल तीर्थक्षेत्र बचाव समितीचे अध्यक्ष अभयसिंह इचगावकर यांनी उपस्थित केला. संभाव्य पंढरपूर कॉरिडॉरला विरोध दर्शविण्यासाठी बुधवारी समितीच्या वतीने दुचाकी फेरी काढण्यात आली.

या फेरीद्वारे शहरातील विविध शासकीय व मोकळ्या जागांची पाहणी करून, त्या जागांचा विकासासाठी उपयोग करता येऊ शकतो, हे निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. खादी ग्रामोद्योग येथील मोकळ्या जागेपासून सुरू झालेल्या या फेरीने लोटेवाडी म्हसोबा, फटाका स्टॉल मैदान, जिजामाता उद्यान, टिळक स्मारक, जुने न्यायालय, हनुमान मैदान, नगरपालिका दवाखाना, जुनी नगरपरिषद इमारत, लोकमान्य हायस्कूलची जुनी इमारत, लिमयेवाडा, सातमजली दर्शन मंडप परिसर, स्मशानाजवळील आगामी दर्शन मंडप, संत गजानन महाराज पिछाडीचे वाहनतळ, संत गाडगे महाराज चौक, एमटीडीसी भक्तनिवास, ब्लड बँक परिसर, पद्मावती उद्यान आदी ठिकाणांची पाहणी केली.

पाहणीनंतर या सर्व जागांचा अहवाल प्रांताधिकारी कार्यालयात सादर करण्यात आला. यावेळी इचगावकर म्हणाले की, अनेक शासकीय जागा वर्षानुवर्षे विनावापर पडून आहेत. त्यांचा सुयोग्य वापर करून विकास आराखडा तयार करण्याचा प्रस्ताव वारकरी संप्रदाय पाईक संघ, तीर्थक्षेत्र बचाव समिती व संतभूमी बचाव समिती यांच्या वतीने शासनाला देण्यात आला असून, त्यावर तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली.

या दुचाकी फेरीत सुमारे ५०० हून अधिक नागरिक सहभागी झाले होते. महिलांची उपस्थितीही लक्षणीय होती. ह.भ.प. माउली महाराज गुरव, ह.भ.प. वडगावकर महाराज, बाबाराव महाजन-बडवे, चंद्रकांत निकते, वैभव बढवे, व्यंकटेश कुलकर्णी, अनिल गवळी, गणेश लंके, महेश काळे, वैभव कुंभारे, सतीश मुळेवाडीकर, संतोष हिलाळ, डॉ. प्राजक्ता बेणारे, सुलभा वट्टमवार आदींसह कॉरिडॉरविरोधी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# 'चूल पेटली आंदोलनासाठी' गॅस तुटवड्याविरोधात महिलांचा जिल्हा परिषदेसमोर एल्गार!



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- घरगुती गॅसचा तीव्र तुटवडा आणि सरकारच्या चुकीच्या धोरणांविरोधात अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या वतीने ८ एप्रिल रोजी जिल्हा परिषद पुनम गेट येथे अनोखे व लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. संघटनेच्या राज्याध्यक्षा कॉ. नसीमा शेख व जिल्हा अध्यक्षा शकुंतला पाणीभाते यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

या आंदोलनात महिलांनी प्रत्यक्ष चूल पेटवून स्वयंपाक करत आणि त्याच ठिकाणी जेवण करून सरकारच्या धोरणांचा तीव्र निषेध नोंदवला. 'गॅस नाही, तर चूलच पेटवू!' असा निर्धार व्यक्त करत महिलांनी आपल्या संतापाला वाट मोकळी करून दिली.

मोठ्या संख्येने महिलांनी या आंदोलनात सहभाग घेतला. वाढत्या महागाईमुळे आणि गॅसच्या तुटवड्यामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे जीवन कसे विस्कळीत झाले आहे, याची झलक या आंदोलनातून स्पष्टपणे दिसून आली.

या प्रसंगी राज्याध्यक्षा कॉ. नसीमा शेख यांनी आक्रमक भाषण करत सरकारवर जोरदार टीका केली. त्या म्हणाल्या, 'सरकारच्या चुकीच्या निर्णयांमुळे सर्वसामान्य महिला व कुटुंबांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. गॅससारख्या मूलभूत गरजेच्या बाबतीतही नागरिकांना संघर्ष करावा लागत असेल, तर हे सरकारचे अपयश आहे.'

आंदोलनादरम्यान 'महागाई कमी करा', 'गॅस पुरवठा सुरळीत करा' अशा घोषणा देण्यात आल्या. तसेच, तात्काळ गॅस पुरवठा सुरळीत करावा व दर नियंत्रणात आणावेत, अशी मागणी करण्यात आली.

या अनोख्या आंदोलनामुळे परिसरात मोठी गर्दी झाली होती आणि नागरिकांचे लक्ष वेधले गेले. महिलांच्या या तीव्र व सर्जनशील आंदोलनामुळे प्रशासनावर दबाव निर्माण झाला असून, सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

या आंदोलनाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा सचिव शेवंता देशमुख, राज्य समिती सदस्य अफसाना बेग, गीता वासम, जलालबी शेख, रसूला शेख, फातिमा मडकी, साहेब शेख, परविन शेख, तबसुम शेख, जमील शेख, अरुणा रासकोंडा, उमा बोगा, लक्ष्मी माचेर्ला, जमुना कळसकर आदींनी परिश्रम घेतले.

# आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करा; नियमभंगास कारवाई



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्वांनी नियमांचे काटेकोर पालन करावे. उत्सव आनंदाने व उत्साहात साजरा करावा; मात्र कोणीही कायदा हातात घेतल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी दिला.

पोलीस आयुक्तालयात बुधवारी आयोजित शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. १४ ते १९ एप्रिल दरम्यान होणाऱ्या जयंती उत्सवाच्या अनुषंगाने ही बैठक घेण्यात आली. प्रारंभी पोलीस उपआयुक्त अश्विनी पाटील यांनी प्रस्तावना करत बैठकीचा उद्देश स्पष्ट केला.

यावेळी रॉकी बंगाळे यांनी दोन्ही मध्यवर्ती मंडळांना एकत्र आणल्याबद्दल पोलीस आयुक्तांचे कौतुक केले. डॉल्बी संदभार्तील निर्णय सर्वांनी मान्य केल्याचे त्यांनी नमूद केले. बैठकीत दशरथ कसबे, अरुण भालेराव, राजाभाऊ इंगळे, उत्सव अध्यक्ष लौकिक इंगळे, नागेश इंगळे, बबलू गायकवाड, सुबोध वाघमोडे, पिंटू डावरे, सत्यजीत वाघमोडे आदींनी आपली मते व्यक्त केली.

पोलीस आयुक्तांनी सांगितले की, मिरवणुकीत सर्व मंडळांना समान संधी मिळावी. एकाच ठिकाणी जास्त वेळ थांबू नये आणि सुमारे १५ मिनिटांत पुढे सरकावे. पोलीस प्रशासनाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांचे पालन करावे. तसेच सर्वसामान्य नागरिकांना त्रास होईल अशी कोणतीही कृती टाळावी.

यावेळी महानगरपालिका, महावितरण, आरटीओसह विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून मंडळांच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. बैठकीस पोलीस उपायुक्त विजय कवाडे, गौहर हसन, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, महावितरणचे अभियंता राजकुमार पाटील यांच्यासह शांतता समितीचे सदस्य उपस्थित होते.

### पोलीस प्रशासनाला सहकार्य

मिरवणूक मार्गावरील रस्त्यांवरील खड्डे त्वरित बुजवावेत, झाडांच्या फांद्या छाटाव्यात तसेच उत्सव काळात पाणीपुरवठा सुरळीत ठेवावा, अशी मागणी करण्यात आली. डॉल्बीच्या मुद्द्यावरून काही जणांकडून मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न होत असला तरी उत्सव काळात पोलीस प्रशासनाला पूर्ण सहकार्य करू, असे मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी सांगितले.

### संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न

गेल्या काही दिवसांपासून जयंती मिरवणुकीबाबत शहरात चर्चा सुरू असून काही मंडळींकडून जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न झाला आहे. मात्र, शहराची परंपरा कायम ठेवत पारंपरिक मार्गावरूनच मिरवणूक काढली जाईल आणि प्रत्येक मंडळाला सहभागी होण्याची संधी दिली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले.

# चव्हाणवाडीत छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा शांततेत स्थलांतरित



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त)**:- माढा तालुक्यातील खेलोबाचे अंजनगाव येथे काही दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यावरून दोन समाजांमध्ये तणाव निर्माण झाला होता. या प्रकरणात प्रशासन व राजकीय पदाधिकाऱ्यांना हस्तक्षेप करावा लागला होता. काही समाजकंटकांच्या बोलण्यामुळे वाद वाढत गेला असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तब्बल चार दिवस प्रयत्न करावे लागले. अखेर पुतळा स्थलांतरित करून वाद मिटवण्यात प्रशासनाला यश आले.

या घटनेनंतर अवघ्या चार दिवसांतच टेंभुर्णीपासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर असलेल्या चव्हाणवाडी येथे छत्रपती संभाजी महाराजांचा छोटा पुतळा बसविण्यात आल्याची घटना समोर आली. सोमवारी (दि. ६) मध्यरात्री अज्ञात शिवप्रेमींनी अंगणवाडी शेजारील शासकीय मोकळ्या जागेत हा पुतळा बसविला होता.

विशेष म्हणजे, या ठिकाणी कोणताही विरोध किंवा तणाव निर्माण झाला नव्हता. तरीही भविष्यात कोणताही वाद उद्भवू नये, यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलली. घटनेची माहिती मिळताच पोलिस व महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि ग्रामस्थांशी संवाद साधला.

यानंतर टेंभुर्णी पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक घेण्यात आली. बैठकीत शासकीय जागेवर कोणताही पुतळा उभारण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व शासनाची परवानगी घेणे बंधनकारक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. त्यामुळे सध्या बसविण्यात आलेला पुतळा हलविण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रशासनाच्या सूचनेला चव्हाणवाडीतील ग्रामस्थांनी सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण सहकार्य केले. त्यानुसार संबंधित पुतळा शेजारील सुभाष पंढरीनाथ चव्हाण यांच्या खाजगी जागेत शांततेत स्थलांतरित करण्यात आला. या निर्णयामुळे कोणताही वाद न होता गावात शांतता कायम राखण्यात यश आले.

या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान तहसीलदार संजय भोसले, पोलिस अधिकारी अंजना कृष्णा, परिविक्षाधीन अधिकारी राहुल आत्राम यांच्यासह ग्रामसेवक, पोलीस अधिकारी व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

प्रशासनाच्या दक्षतेमुळे संभाव्य तणाव टळला असून, पुढील काळात अशा प्रकारच्या घटनांमध्ये कायदेशीर प्रक्रिया पाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# सोलापूरात भाजप सहकार सेलची नवी कार्यकारिणी जाहीर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- भारतीय जनता पार्टी, सोलापूर शहर जिल्हा यांच्या सहकार सेल (प्रकोष्ठ)ची नवीन कार्यकारिणी आज जाहीर करण्यात आली. सहकार सेलचे संयोजक गणेश चौटे यांच्या वतीने महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे तसेच स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते यांची प्रमुख उपस्थिती होती.

नवीन कार्यकारिणीत सहसंयोजक म्हणून किशोर नारायणराव बसूदे आणि प्रशांत रामकृष्ण हबीब यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच सदस्य म्हणून प्रमोद सुनील पवार, कृष्णाथ खंडूसा दलमंजन, राकेश शंकर काशिगाव, अभिषेक श्रीनिवास पवार, सतीश मोतीलाल बिद्री, राहुल मोतीलाल शालगर, बसवराज शिवपुत्र इंडे, शिवानंद पंचय्या पुराणिक, श्रीनिवास मधुकर पेठकर, राजू गिरूसा पवार, चंद्रकांत बुडप्पा मिस्कीन आणि अर्जुन हणमंसा पवार यांचा समावेश करण्यात आला आहे.

या सर्व पदाधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्रे देण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नव्या कार्यकारिणीचे अभिनंदन करत पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच सहकार क्षेत्रात प्रभावी काम करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमादरम्यान सहकार सेलच्या वतीने महापौर विनायक कोंड्याल यांचा सत्कारही करण्यात आला.

# कोंडी, बीबी दारफळ येथे अवैध गौण खनिज कार्यवाहीत 6 हायवा व 1 पोकलँड जप्त




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त)**:- उत्तर सोलापूर तहसील कार्यालयाच्या पथकाने जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे कोंडी, बीबी दारफळ परिसरात अवैध गौण खनिज उत्खननावर मोठी कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती तहसीलदार निलेश पाटील यांनी दिली. या कारवाईत 6 हायवा व 1 पोकलँड जप्त करण्यात आले आहे. संबंधितांवर तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी यांच्या सूचनांनुसार अवैध खनिज उत्खननाविरोधात कठोर कारवाई सुरू असून, अशा प्रकारच्या बेकायदेशीर उपक्रमांना आळा घालण्यासाठी तालुका प्रशासन सज्ज असल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले.

## चौकशीची जाहीर नोटीस

ब.अ.नं.०१/२०१०
कि.क.अ. क्र. ०२/२०१०
संस्थेचे नांव :- ज्ञानदिप शिक्षण प्रसारक मंडळ डोणगांव.
न्यास नों.क्र. :- एफ -३३२ /सोलापूर

श्री प्रिती विलास चिखलीकर } अर्जदार

विरूध्द

कोणी नाही } गैरअर्जदार

सदरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ व सोसायटीज रजिस्ट्रेशन अ‍ॅक्ट १८६० चे कलम १२-अ अन्वये संस्थेच्या उद्देशात व घटना नियमावलीत बदल करून मिळणेसाठी अर्ज मा.उप धर्मादाय आयुक्त साहेब यांच्या कार्यालयात दाखल केलेले आहे. या नोटीसीध्दारे कळविण्यात येते की. या न्यासाचे आपले काही संबंध असल्यास अथवा काही हरकत / तक्रार नोंद करायची असल्यास आपण स्वत: किंवावकिलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आपली हरकत लेखी स्वरूपात दाखल करावी ३० दिवसानंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही. आणि एकतर्फा हुकुम करून सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी. ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. धर्मादाय उपाआयुक्त यांचे शिक्यानिशी दि०९/०४/२०२६ दिली आहे.(टीप. सदरील नोटीस प्रसिध्द करण्याचा खर्च न्यासाच्या अर्जदार यांच्यावरती राहील.)

लिपीक (शिक्का) अधिक्षक
सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय
सोलापूर विभाग सोलापूर

## सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१.
**सार्वजनिक आरोग्य अभियंता (जलवितरण विभाग)**
e-mail : smcphewtr@gmail.com

जा.क्र/साआअ/जल/०६ दिनांक :- ०८/०४/२०२६

**पाणीपुरवठा विभाग**
**पाणी पुरवठा संबंधीचे निवेदन**

सोलापूर महानगरपालिका पाणी पुरवठा अंतर्गत जुळे सोलापूर MBR उंचावरील टाकीवरुन पाणी पुरवठा करणारी मुख्य पिण्याची पाईप लाईन आसरा पुला लगत कल्याणनगर जवळ रेल्वे ट्रॅक खाली नादुरुस्त होवून पाण्याची मोठया प्रमाणात गळती होत आहे. सदर गळती दुरुस्तीचे काम रेल्वे विभागाच्या संमतीने शुक्रवार दि. १०/०४/२०२६ रोजी सोलापूर महानगरपालिकेमार्फत हाती घेणेत येणार आहे. दुरुस्तीचे काम रेल्वे रुळाच्या खाली व रेल्वे सिग्नलसाठी कार्यरत असलेले केबलची काळजी घेवून करावे लागणार आहे. त्यामुळे दुरुस्तीचे काम करणेस बराच कालावधी लागणार असल्यामुळे संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा शुक्रवार दि. १०/०४/२०२६ पासून एक रोटेशन एक दिवसाने पुढे जाणार आहे.

तरी कृपया नागरीकांनी दैनंदिन पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती आहे.क. दि. ०७/०४/२०२६

सही/-
सार्वजनिक आरोग्य अभियंता
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे २) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा ५) कोकणातील एक स्ट्राँग नेते ६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत) १०) ग्रॅज्युएट (मराठीत) १२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत) १६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा २५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका- चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क ३०) याचे कणीस भाजून खातात ३१) उत्सवाचा दिवस ३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख ४१) वाट, मार्ग (हिंदीत) ४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 222

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | | | 4 | | | 6 | |
| | | 1 | 6 | | | 8 | 9 | |
| | | 9 | 8 | 3 | 1 | 5 | | 7 |
| 4 | 9 | | 1 | 5 | 7 | | | |
| | | | | | | | | |
| | 5 | 3 | | | 4 | | | |
| 9 | 6 | | 4 | 1 | 5 | | | 8 |
| 1 | | | 7 | 6 | 3 | 2 | | |
| 3 | | | | 2 | 8 | | 5 | 1 |

# नातेपुते ग्रामीण रुग्णालयाचे अत्याधुनिक रूपांतर करण्याची आरोग्यमंत्र्याकडे मागणी

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील महत्त्वाचे केंद्र असलेल्या नातेपुते ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या अत्याधुनिक रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यात यावे, या मागणीचे निवेदन शिंदेसेना माळशिरस तालुकाप्रमुख व जिल्हा नियोजन समिती सदस्य सतीश सपकाळ यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना दिले आहे.

नातेपुते आणि सभोवतालचा परिसर भौगोलिकदृष्ट्या मोठा असून लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे.

सध्या या ठिकाणी असलेल्या आरोग्य सुविधा नागरिकांच्या गरजा पूर्ण करण्यास अपुऱ्या पडत आहेत. गंभीर आजार किंवा तातडीच्या उपचारांसाठी येथील गरीब व गरजू रुग्णांना मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागते. यामध्ये वेळ आणि पैसा यांचा मोठा अपव्यय होत असून, अनेकदा रुग्णांचे हाल होतात. ही बाब लक्षात घेऊन सतीश सपकाळ यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे



आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना शिंदेसेना माळशिरस तालुकाप्रमुख व जिल्हा नियोजन समिती सदस्य सतीश सपकाळ यांनी केलेल्या मागण्या नातेपुते ग्रामीण रुग्णालयासाठी शस्त्रक्रिया, स्त्रीरोग तज्ज्ञ आणि बालरोग तज्ज्ञांची कायमस्वरूपी नेमणूक, आधुनिक उपकरणांनी सुसज्ज असे 'ऑपरेशन थिएटर', एक्स-रे, सोनोग्राफी आणि इतर महत्त्वाच्या वैद्यकीय चाचण्यांची सोय, अपघाती किंवा आपत्कालीन स्थितीत तत्काळ उपचार मिळण्यासाठी आवश्यक यंत्रणा.

या संदर्भात सतीश सपकाळ म्हणाले, नातेपुते हे परिसरातील गावांसाठी मुख्य केंद्र आहे. जर येथे ५० खाटांचे सर्वसोयींनी युक्त रुग्णालय झाले, तर ग्रामीण भागातील जनतेला मोठा आधार मिळेल.

सदर वरील बाबींची दखल घेऊन आरोग्यमंत्र्यांनी या प्रश्नी सकारात्मक पाठपुरावा करण्याचे आश्वासन सतीश सपकाळ यांना दिले आहे.

# समाजकल्याण विभागाने पारदर्शकपणे लोकहिताची कामे करावीत- सभापती संस्कृती सातपुते

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या नूतन सभापती संस्कृती सातपुते यांनी पदभार स्वीकारल्यानंतर लोकहिताच्या कामकाजाला गती दिली असून नुकतीच विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी स्पष्ट केले की, समाजकल्याण विभाग हा जिल्ह्यातील दलित व दुर्बल घटकांसाठी काम करणारा अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे, त्यामुळे कामकाजात पारदर्शकता ठेवून सर्व घटकांना न्याय देणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांशी कर्मचाऱ्यांनी सौजन्याने वागावे आणि कोणत्याही स्तरावर नागरिकांची आर्थिक पिळवणूक



होणार नाही याची दक्षता घ्यावी; अन्यथा तक्रार प्राप्त झाल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा सक्त इशारा त्यांनी यावेळी दिला.

विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती देण्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांना सविस्तर प्रेझेंटेशन सादर करण्याच्या सूचना केल्या. विशेषतः मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत कोणतीही त्रुटी राहू नये आणि एकही पात्र विद्यार्थी लाभापासून वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी, असे त्यांनी सांगितले. वसतिगृहातील सोयीसुविधांबाबत आपण आग्रही असून, पुढील महिन्यापासून मी स्वतः विविध वसतिगृहांना भेटी देऊन तेथील परिस्थितीची पाहणी करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना कोणताही गैरप्रकार होणार नाही आणि केवळ समितीने शिफारस केलेल्या खऱ्या लाभार्थ्यांनाच लाभ मिळेल, याची खात्री करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

सभापती सातपुते यांनी अधिकारी व कर्मचारी यांना केलेल्या सूचनेमुळे प्रशासकीय कामकाजाला गती मिळाली असून सर्वसामान्य जलद गतीने न्याय मिळेल अशा आशा व्यक्त केल्या जात आहेत.

# अकलूज येथे 9 कोटी 30 लाख रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन



**कलूज (कटूसत्य वृत्त):-** शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत प्रभाग क्र. 12 आणि प्रभाग क्र. 11 मधील एकूण 9 कोटी 30 लाखांच्या सिमेंट काँक्रिट रस्ता व गटर बांधकामांच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला. या कामांचे भूमिपूजन नगराध्यक्ष रेश्माताई अडगळे व उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते पार पडले.

या प्रसंगी नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील, स्वाती फुले, शितल बनपट्टे, नाशिक सोनवणे तसेच लालासाहेब अडगळे, लखन गायकवाड, राजेंद्र फुले, डॉ. एकतपुरे, डॉ. शेटे, डॉ. सूर्यवंशी यांच्यासह दोन्ही प्रभागांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रभाग क्र. 12 मध्ये विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल ते सुजयनगर 14 पर्यंत सिमेंट काँक्रिट रस्ता व गटर बांधकामासाठी 5 कोटी 58 लाखांचा निधी मंजूर करण्यात आला असून या कामास आज सुरुवात झाली. तसेच प्रभाग क्र. 11 मध्ये हॉटेल व्हेज ट्रीट ते ताम्हाणे कॉम्प्लेक्सपर्यंत सिमेंट रस्ता व गटर बांधकामासाठी 3 कोटी 72 लाखांचा निधी खर्च करण्यात येणार असून या कामाचाही शुभारंभ करण्यात आला. या विकासकामांमुळे नागरिकांना दर्जेदार रस्ते, सुलभ वाहतूक आणि सुधारित स्वच्छता सुविधा मिळणार आहेत. परिणामी परिसराच्या विकासाला अधिक वेग मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

अकलूज शहराचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास असून, अशा पायाभूत सुविधांच्या कामांमुळे शहराच्या प्रगतीला नवी दिशा मिळत असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांची ९६ वी जयंती, श्री श्री श्री १००८ जगद्गुरु दारूकाचार्य व एकोरामाराध्य जयंती व घोंगडीवर बसून भीमा नदी ओलांडलेले पवाड पुण्य पुरुष चन्नबसव शिवाचार्य महास्वामीजी यांची पुण्यतिथी निमित्त प्रति वर्षाप्रमाणे यंदाही शनिवार दि.१८ एप्रिल ते २१ एप्रिल पर्यंत श्री बृहन्मठ होटगी ता. द. सोलापूर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली. शनिवार दिनांक १९ एप्रिल ते २१ एप्रिल पर्यंत दररोज श्री श्री श्री १००८ जगदाचार्य मूर्तीस व श्री गुरु गादीस रुद्राभिषेक, रविवार



१९ एप्रिल रोजी जगद्गुरु एकोरामाराध्य जयंती निमित्त काशी पिठाचे जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते व अनेक शिवाचार्यांच्या उपस्थितीत वेदमूर्ती परमेश्वर शास्त्री व हल्लाळी शास्त्री यांच्या वैदिकत्त्वाखाली अय्याचार व दीक्षा विधी संपन्न होणार आहे. तरी ज्या माहेश्वर बटूंना व वीरशैव बांधवांना अय्याचार व दीक्षा करून घ्यावयाचे आहे. त्यानी मौजे होटगी येथील मठात आपले नावे नोंदवावीत. मंगळवार दि.२१ एप्रिल रोजी श्री श्री श्री १००८ जगद्गुरु दारूकाचार्य जयंती व श्री चन्नबसव शिवाचार्य यात्रा महोत्सवानिमित्त सकाळी ८.०० वा. जगद्गुरु दारूकाचार्य मूर्तीची मिरवणूक होऊन महामंगलारती व त्यानंतर महाप्रसाद वाटप होणार आहे. तरी या सर्व कार्यक्रमात भक्तानी व जंगम बटूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# केळी निर्यातदारांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारची कार्यवाही

## खा मोहिते पाटील यांच्या मागणीला केंद्र सरकारचे उत्तर

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांना १७ मार्च २०२६ रोजी पाठवलेल्या पत्रात इराण-इस्त्रायल संघर्ष मुळे Strait of Hormuz (होर्मुज सामुद्रधुनी) मार्गे सागरी वाहतूक ठप्प झाली असून, त्याचा भारतातील महाराष्ट्रातील केळी निर्यातदारांना मोठा फटका बसत असल्याचे नमूद केले होते. या पार्श्वभूमीवर वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष



गोयल यांनी खासदारांच्या पत्राची दखल घेतली असून, संबंधित विषय मार्गी लावण्या संदर्भात कार्यवाही करण्यात आल्याचे पत्राद्वारे माहिती कळवली आहे. सदर परिस्थितीमुळे जेएनपीटी मुंद्रा पोर्ट येथे मोठ्या प्रमाणावर केळीचे कंटेनर अडकून पडले आहेत. त्यामुळे निर्यातदारांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. खासदार मोहिते पाटील यांनी या प्रश्नावर तातडीने तोडगा काढून निर्यातदारांना दिलासा देण्याची मागणी केली होती. यावर केंद्र सरकारकडून सकारात्मक पावले उचलली जात असल्याचे दिसून येत असून, लवकरच याबाबत ठोस निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये 'IDE बूटकॅम्प 2026' चा चौथा दिवस उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे सुरू असलेल्या पाच दिवसीय 'IDE बूटकॅम्प 2026'चा गुरुवारी चौथा दिवस उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी इनोव्हेशन, डिझाईन आणि उद्योजकता संकल्पनांवर आधारित विविध कल्पना सादर करत त्यांना प्रत्यक्ष प्रकल्पांच्या रूपात विकसित करण्याचा प्रयत्न केला.

बूटकॅम्पदरम्यान तज्ज्ञ वक्त्यांनी विद्यार्थ्यांना आयडिया जनरेशन, डिझाईन थिंकिंग, प्रोटोटायपिंग आणि स्टार्टअप उभारणीसंदर्भात मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी गटांमध्ये काम करत विविध सामाजिक व औद्योगिक समस्यांवर उपाय शोधण्याचे प्रयत्न केले. मार्गदर्शकांच्या सहकार्याने या कल्पनांना व्यावहारिक रूप देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे दिसून आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रमाची दृष्टी विकसित होत असून, उद्योजकतेकडे वाटचाल करण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यास मोठी मदत होत आहे. बूटकॅम्पच्या शेवटच्या दिवशी विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे सादरीकरण होणार असून, उत्कृष्ट संकल्पनांना पुढील स्तरावर मार्गदर्शन मिळणार आहे.

# भीम जयंती निमीत्त सम्राट प्रतिष्ठानच्या वतीने विविध कार्यक्रम

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने, सम्राट प्रतिष्ठान अकलूज यांच्या वतीने विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक शशिकांत भोसले यांनी दिली.

रविवार दिनांक 12 एप्रिल 2026 रोजी आयुष्यमान कार्ड काढणे, सोमवार दिनांक 13 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10 ते दुपारी 2 वाजेपर्यंत,रक्त तपासणी, थायरॉईड तपासणी तसेच महिलांसाठी मनोरंजनात्मक विविध कार्यक्रम, मंगळवार दिनांक 14 एप्रिल 2026 रोजी सकाळी 7.00 वाजता प्रतिमा पूजन व सकाळी 10 ते 2 वाजेपर्यंत स्नेहभोजन अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले



असल्याची माहिती सम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक शशिकांत भोसले यांनी दिली.

सदरचे कार्यक्रम महादेव नगर अकलूज येथील पाण्याच्या टाकी परिसरात घेण्यात येणार असून, याचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन भोसले यांनी केले आहे.

काही दिवसांपूर्वी सम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक शशिकांत भोसले म्हणाले होते की महापुरुषांच्या विचारांची जयंती साजरी होणे गरजेचे आहे. सध्याच्या युगात तरुण पिढीला मोबाईलचे जास्त आकर्षण आहे. तरुण पिढी मोबाईलच्या जगात हरवत चालली आहे. आणि हे येणाऱ्या काळासाठी खूप घातक आहे असे वाटते.कारण कृत्रिम बुद्धिमत्तेचा जास्त वापर होताना दिसत आहे. शिवाय वाचना पासून आपण दूर जाऊ लागलो आहे. याकरिता महापुरुषांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक उपक्रम राबवणे गरजेचे आहे, म्हणून आम्ही याही वर्षी अनावश्यक खर्चाला फाटा देऊन वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करणार असल्याचे सम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत भोसले म्हणाले होते.त्यांनी म्हणल्या प्रमाणे सम्राट प्रतिष्ठानच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहिर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माहे जानेवारी 2026 ते डिसेंबर 2026 मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रभाग रचना कार्यक्रमाच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील अचकदाणी, आगलावेवाडी, अजनाळे, अकोला, आलेगाव, बामणी, भोपसेवाडी, बुद्धेहाळ, बुरंगेवाडी, चोपडी, देवळे, धायटी, डिकसळ, डोंगरगाव, एखतपूर, गायगव्हाण, घेरडी, गौडवाडी, मंगेवाडी (ह.), हलदहिवडी, हंगीरगे, हणमंतगाव, हातीद, इटकी, जवळा, जुजारपूर, जुनोनी, कडलास, कमलापूर, कटफळ, खिलारवाडी, किडबिसरी, कोळे, लक्ष्मीनगर, लोणविरे, लोटेवाडी, महिम, महूद बु., मानेगाव, मांजरी, मेडशिंगी, मेथवडे, नराळे, नाझरे, निजामपूर, पाचेगाव बु., पारे, राजुरी, संगेवाडी, शिरभावी, सोमेवाडी, तरंगेवाडी, तीप्पेहळी, उदनवाडी, वझरे, शिवणे, वाकी घेरडी, वाणी चिंचाळे, वासूद, वाटंबरे, मंगेवाडी (य.) व बुरलेवाडी अशा एकूण 62 ग्रामपंचायतींसाठी प्रारूप प्रभाग रचना (नमुना 'ब') तयार करण्यात आलेली आहे.

सदर प्रारूप प्रभाग रचना संबंधित ग्रामपंचायतींच्या तलाठी कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालय येथे नागरिकांच्या अवलोकनासाठी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने हरकती व सूचना सादर करण्याचा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे. प्रारूप प्रभाग रचनेवरील हरकती व सूचना तहसिलदार यांच्याकडे समक्ष सादर करण्याची अंतिम मुदत : 13 एप्रिल 2026 प्राप्त हरकती व सूचना दिनांक 16 एप्रिल 2026 पर्यंत मा. उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी सादर करण्यात येतील मा. उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा विभाग यांच्याकडे सुनावणी दिनांक : 21 एप्रिल 2026 तरी संबंधित ग्रामपंचायतीतील नागरिकांनी प्रारूप प्रभाग रचना पाहून आपापल्या हरकती व सूचना निर्धारित मुदतीत सादर कराव्यात, असे आवाहन तहसिलदार सांगोला श्रीमती बाळुताई भागवत यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# त्रैमासिक विवरणपत्र ई.आर-1 ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी कार्यालयांनी मार्च 2026 अखेरचे त्रैमासिक विवरणपत्र (ई.आर-1) 30 एप्रिल 2026 पर्यंत ऑनलाईन सादर करणे बंधनकारक असल्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**कायदेशीर तरतूद**

- सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे अधिसूचीत करण्याची सक्ती करणारा) कायदा 1959 व नियमावली 1690 मधील कलम 5(1) व 5(2) नुसार ही माहिती सादर करणे आवश्यक आहे.
- सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांची पुरुष/स्त्री/एकूण संख्या स्थानिक सेवायोजन कार्यालयास ऑनलाईन सादर करावी.

**माहितीचा उपयोग**

- प्राप्त सांख्यिकी माहितीचा उपयोग योजनाबद्ध आर्थिक विकासासाठी, प्रकल्प तयार करण्यासाठी व मनुष्यबळाचा अंदाज घेण्यासाठी केला जातो.
- ही माहिती महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालय, नवी दिल्ली यांना दर तिमाहीस पाठविली जाते.

**सादरीकरणाची प्रक्रिया**

- विवरणपत्र ई.आर-1 हे https://rojgar.mahaswayam.gov.inया वेबपोर्टलवर सादर करणे आवश्यक आहे.
- प्रत्येक आस्थापनाला युजर आयडी व पासवर्ड पूर्वीच देण्यात आले असून त्याचा वापर करून विवरणपत्र भरावे.

अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापूर (0217-2992956) येथे संपर्क साधावा. तसेच सर्व आस्थापनांनी विहित वेळेत विवरणपत्र सादर करावे, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाच्या सहाय्यक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे

# सांगोला तालुक्यातील ग्रामपंचायतींसाठी पोटनिवडणूक कार्यक्रम जाहीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सांगोला तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये सदस्य, थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा किंवा अनर्हतेमुळे रिक्त झालेल्या जागांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यासंदर्भातील अधिसूचना दिनांक 30 मार्च 2026 रोजी पंचायत समिती कार्यालय, तलाठी कार्यालय व संबंधित ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**निवडणूक कार्यक्रम**

नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याची मुदतः 7 एप्रिल ते 13 एप्रिल 2026 (11 व 12 एप्रिल सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11.00 ते दुपारी 3.00, तहसिल कार्यालय सांगोला येथे.

**नामनिर्देशनपत्रांची छाननी:** 15 एप्रिल 2026 रोजी सकाळी 11.00 वाजता तहसिल कार्यालय सांगोला येथे.

- उमेदवारी मागे घेण्याची अंतिम मुदतः 17 एप्रिल 2026 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत.
- मतदानः निवडणूक लढविण्यात आल्यास मतदान 28 एप्रिल 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत होणार आहे.

**निवडणूक तपशील**

- या पोटनिवडणुकीत एकूण 4 ग्रामपंचायतींसाठी 6 प्रभाग व 6 मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.
- अनकढाळ ग्रामपंचायतः सरपंच पदाची थेट जनतेतून निवड तसेच 3 सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक.
- खवासपूर, चिणके व चिकमहूद ग्रामपंचायतीः प्रत्येकी 1 सदस्य पदासाठी पोटनिवडणूक.
- निवडणूक प्रक्रियेसाठी 2 निवडणूक निर्णय अधिकारी व 4 सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासनाने संबंधित मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे.

# मराठा साम्राज्याचा नकाशा पुन्हा एनसीईआरटीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** NCERT ने इयत्ता आठवीच्या अभ्यासक्रमातून मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शवणारा नकाशा हटवण्याचा निर्णय घेतला आहे या निर्णयाला संभाजी ब्रिगेडने तीव्र विरोध करून पूर्वी जो मूळ नकाशा होता तो कायम ठेवण्याची मागणी भारताचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान त्यांच्याकडे ईमेल द्वारे करण्यात आली आहे.

मूळ नकाशाला विरोध केल्या नंतर त्यात बदल करून काही तत्कालीन राजपूत राज्ये वगळण्यात आली. त्यास ही विरोध करण्यात आल्या नंतर संपूर्ण नकाशाच काढून टाकण्यात आला.

मराठा साम्राज्याचा इतिहास म्हणजे केवळ भूतकाळ नाही, तर स्वाभिमान, पराक्रम आणि राष्ट्ररक्षणाची जाज्वल्य परंपरा आहे. हा भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय आहे.

छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीत मराठे दिल्लीपर्यंत जाऊन पोहोचले होते. पुढे जाऊन त्याचा विस्तार अगदी अटक पर्यंत झाला.



**राजस्थानातील मराठ्यांच्या मोहिमा याचे जिवंत उदाहरण आहेत –**

* रामपुरा मोहिम (1734-35) – मराठ्यांचा विजय
* बुंदी मोहिम (1730 च्या दशकात) – हस्तक्षेप करून गादी स्थापन
* कक्कोरचे युद्ध (1759) जयपूरवर विजय
* पाटनचे युद्ध (1790) – शिंदेंचा निर्णायक विजय
* मेर्टा युद्ध (1790) – जोधपूरचा पराभव
* – मालपुरा युद्ध (1800) –मराठ्यांचा प्रभाव प्रस्थापित

या सर्व मोहिमांमधून मराठ्यांचे पराक्रम, वेगवान युद्धनीती आणि उत्तर भारतातील प्रभाव स्पष्ट दिसतो. अनेक राजपूत राज्यांनी मराठ्यांचे वर्चस्व मान्य केले होते

अशा गौरवशाली आणि प्रेरणादायी इतिहासाचे प्रतिनिधित्व करणारे घटक अभ्यासक्रमातून कमी करणे किंवा हटवणे हे दुर्दैवी आहे.

इतिहास हा कोणत्याही दबावाखाली बदलला जाऊ नये, तर तो सत्य आणि पुराव्यांच्या आधारे पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे मा. पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम जिल्हा कार्याध्यक्ष इशरत नागोरे जिल्हा उपाध्यक्ष फिरोज सय्यद दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष जैनुद्दीन नदाफ असद नागोरे आदी उपस्थित होते.

# सिंहगड कॉलेजच्या विद्यार्थिनीची पोलीस भरतीत दमदार कामगिरी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग केगाव, सोलापूर येथील विद्यार्थिनी गौरी अनिल वाघमारे हिने पोलीस भरतीत उल्लेखनीय यश संपादन करत सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलीसमध्ये निवड मिळवली आहे. तिच्या या यशामुळे परिसरात तिचे कौतुक होत आहे.

मोहोळ तालुक्यातील कोरवली येथील रहिवासी असलेल्या गौरीचे वय 20 वर्षे असून ती शेतकरी कुटुंबातील आहे. वडील शेती करतात तर आई गृहिणी आहेत. प्रतिकूल परिस्थितीतही तिने शिक्षणासोबत स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवली.




गौरीने प्राथमिक शिक्षण गावात पूर्ण केले असून 12 वी नंतर ती सध्या सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर येथे इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत आहे.

पोलीस भरती प्रक्रियेत तिला एकूण 118 गुण मिळाले असून ती SC प्रवगार्तून प्रथम क्रमांकाने निवडली गेली आहे. तिची निवड सोलापूर ग्रामीण पोलीस दलात झाली आहे. मेहनत आणि चिकाटीचा प्रवास

प्रथम वर्षात प्रवेश घेतल्यानंतरच गौरीने पोलीस भरतीचे स्वप्न पाहिले. सुरुवातीला तिला रनिंग आणि फिजिकल चाचण्यांमध्ये अडचणी आल्या. मात्र, कॉलेजच्या मैदानावर दररोज नियमित सराव करत तिने स्वतःमध्ये सातत्याने सुधारणा केली. फिजिकल टेस्टमध्ये 800 मीटर, 100 मीटर धावणे आणि गोळाफेक यासाठी तिने विशेष मेहनत घेतली. पहिल्या प्रयत्नात काही अडचणी आल्या, मात्र दुसऱ्या प्रयत्नात तिने उत्तम कामगिरी करत यश मिळवले. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या आणि विभागीय उपआयुक्त संजय माने यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यावेळेस प्राचार्य डॉ शंकर नवले, प्रबंधक डॉ. डी. आय नवले यांची उपस्थिती होती. अपयश आले तरी खचू नका.

सातत्य आणि मेहनत ठेवल्यास यश नक्की मिळते. प्रत्येक वेळी नव्या उत्साहाने तयारी करा,ह्व असे ती म्हणाली.

**सिंहगडचा मोठा आधार**

या यशामागे कॉलेज प्रशासनाचा मोठा वाटा असल्याचे गौरीने सांगितले.

कॅम्पस डायरेक्टर आणि प्राध्यापकांनी तिला वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच विभागप्रमुख (HOD) आणि प्राध्यापकांनी अभ्यास व उपस्थितीबाबत सहकार्य करत तिचा आत्मविश्वास

वाढवला.

कॉलेज प्रशासनानेही गौरीच्या यशाबद्दल अभिनंदन करत तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी ज्या मैदानावर तिने तयारी केली त्याच मैदानावर गौरीचा विशेष सत्कार केला.